आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार, दिनांक ०२ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. सहकारातून उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात परिपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थांचं देशातील विकासात मोठं योगदान असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.
2. 309 किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वेमार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्री मंडळाची मंजुरी; नाशिक आणि धुळे जिल्ह्यांना मिळणार लाभ.
3. बैलांप्रती कृतज्ञतेचा सण पोळा आज सर्वत्र साजरा, नागपुरात उद्या निघणार ऐतिहासिक काळी पिवळी मारबत.
4. नागपूर जिल्ह्यातील 94 हजारावर ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना जाहीर.
5. यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी, नागपुरात देखील दमदार पावसाची हजेरी.

****

राष्ट्रपति

सहकारातून उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात परिपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थांचं देशातील विकासात मोठ योगदान असल्याचं प्रतिपादन आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. कोल्हापूर इथल्या श्री वारणा महिला सहकारी विविध उद्योग समुह आपली ५० वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करीत आहे. श्री वारणा महिला सहकारी विविध उद्योग समूहाचा सुवर्ण सोहळा आणि वारणा विद्यापीठाचा उद्घाटन समारंभ आज भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. देशातील अग्रगण्य सहकारी संस्थांमध्ये वारणा समुहाचा समावेश होतो. महिला शिक्षा, आरोग्य आर्थिक अशा सगळ्या क्षेत्रात पुढे आहेत. महिलांच्या या संघटन शक्तीला पुढे नेण्यासाठी वारणा समुह प्रयत्न करीत असल्याबद्दल मुर्मू यांनी समाधान व्यक्त केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ३ दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून या दरम्यान त्या पुणे, मुंबईत आणि लातूर इथं भेटी देणार आहेत.

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज **309** किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वेमार्ग प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. ज्यात मुंबई आणि इंदूर या दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांमधे संपर्क व्यवस्था प्रदान केली जाईल.-एकूण **18** हजार **036** कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प **2028-29** पर्यंत पूर्ण होईल. यात राज्यातील कांदा उत्पादक जिल्हे नाशिक, नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यांना लाभ होणार आहे

(होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव)

*मनमाड-इंदौर न्यू लाइन ये बहुत लम्बे टाइम से एक ऐसा प्रोजेक्ट है जिस प्रोजेक्ट की बहुतही स्ट्रैटेजिक इम्पोर्टेंस है। आप देखो उत्तर महाराष्ट्र के जो धुले और नाशिक जिले है ये दोनों जिले इसमें किस तरह से जो एग्रीकल्चर प्रोडूस है खासकर अनियन है, सोयाबीन है, इन सबके के प्रोडक्शन को कैसे एक अच्छे तरीके से मार्किट तरफ पहुंचा सके । जो आदिवासी बहुल क्षेत्र है धार, वाडवानी, खारगौन,नासिक में भी है धुले में भी कुछ है । तो ये जो जिले है जो की अनकनेक्टेड थे लम्बे टाइम से, इन जिलों को कैसे रेलवे की इस कनेक्टिविटी से जोड़ा जा सके १८ थाउजंट करोड़ रूपीज का प्रोजेक्ट है टोटल ।*

केंद्रीय मंत्रिमंडळाने एकूण **2817** कोटी रुपयांच्या डिजिटल कृषी मिशनला आज मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठे निर्णय घेण्यात आल्याची माहिती नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना संबोधित करताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. डिजिटल कृषी मिशन हे डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या संरचनेच्या धर्तीवर विकसित केलं जात आहे. मंत्रिमंडळाने एकूण ३,९७९ कोटी रुपयांच्या अन्न आणि पोषण सुरक्षेसाठी पीक विज्ञानाला मंजुरी दिली आहे. **2,291** कोटी रुपये खर्चून कृषी शिक्षण, व्यवस्थापन आणि सामाजिक शास्त्रांना बळकटी देण्याचा निर्णय देखील सरकारने घेतला आहे. मंत्रिमंडळाने **1,702** कोटी रुपये खर्चासह शाश्वत पशुधन आरोग्य आणि उत्पादन मंजूर केलं आहे. याशिवाय **860** कोटी रुपये खर्च करून फलोत्पादनाच्या शाश्वत विकासाला मंजुरी देण्यात आली आहे.

****

बैल-पोळा/मारबत

बैलांप्रती कृतज्ञतेचा सण पोळा आज सर्वत्र साजरा होत आहे. आज ग्रामीण भागात अनेक ठिकाणी बैलांना सजवून त्यांचं पूजन करून त्यांना कृतज्ञतापूर्वक पुरणपोळीचा घास भरवला जातो. सायंकाळी बैलांची मिरवणूक काढण्याची परंपरा देखील सर्वत्र दिसून येते. उद्या सर्वत्र लाकडी बैलांच्या तान्हया पोळ्याची लगबग दिसून येईल.

नागपुरातील ऐतिहासिक काळी पिवळी मारबत उद्या निघेल. या मारबती बरोबरच वर्षभर घडणाऱ्या विविध घटना आणि विषयांवर भाष्य करणाऱ्या बडग्यांची मिरवणूक देखील मुख्य आकर्षण असेल. या पार्श्वभूमीवर नागपूर पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

****

ट्रॅक्टर पोळा

दिवसेंदिवस शेतात राबणाऱ्या बैलाची संख्या कमी झाली आहे. कमी वेळात जास्त काम करण्यासाठी शेतकरी शेतीची मशागत ट्रॅक्टरने करत आहेत. त्यामुळे आज बैल पोळा असल्याने भंडारा जिल्ह्याच्या सातोना इथं शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर सजवून गावाच्या चौकात एकत्रित करत ट्रॅक्टर पोळा भरविला आहे. या पोळ्यात नागरिकांनी चांगलीच गर्दी केली आहे.

****

अनिल देशमुख

महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची तरतूद असणारा शक्ति कायदा तातडीनं मंजूर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार अनिल देशमुख यांनी केली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विधिमंडळानं संमत केलेला हा कायदा तीन वर्षांपासून केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पडून आहे. त्याला मंजुरी मिळावी या मागणीसाठी उद्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीकडून आंदोलन करण्यात येणार असल्याचंही देशमुख यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं. विधिमंडळातील सदस्यांची समिती आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन या कायद्याचं प्रारूप तयार करण्यात आलं होतं. त्याला विधिमंडळानं संमतीही दिली होती. आता केंद्राकडून हा कायदा मंजूर करून राज्यात तो लागू करावा, अशी मागणी देशमुख यांनी यावेळी केली.

****

स्मिता शर्मा

स्मिता वत्स शर्मा यांनी आज भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. स्मिता वत्स शर्मा या भारतीय माहिती सेवेच्या **1991** च्या तुकडीतील अधिकारी आहेत. याआधी त्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या अतिरिक्त महासंचालक पदावर कार्यरत होत्या. महाराष्ट्र आणि गोवा येथील पत्र सूचना कार्यालयाचे आणि केंद्रीय संचार ब्युरोचे काम पाहत होत्या. याशिवाय त्यांची केंद्रीय

चित्रपट प्रमाणन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही नियुक्ती झाली होती.

****

जैवइंधन परिषद

जैवइंधन क्षेत्रात प्रचंड क्षमता आहे आणि ते भारताच्या कृषी आणि ग्रामीण क्षेत्रात मोठी भूमिका निभावू शकते. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी भारताला आयात कमी करणं आणि निर्यात वाढवणं आवश्यक आहे असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यासमवेत नवी दिल्ली इथं भारत जैव-ऊर्जा आणि टेक एक्स्पो **2024** आणि जैव-ऊर्जा आणि तंत्रज्ञानावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना त्यांनी ही टिप्पणी केली. ऊर्जा कार्यक्रमाच्या माध्यमातून इंधनावरील अवलंबित्व कमी करणे, परकीय चलनाची बचत करणे आणि स्वच्छ आणि स्वावलंबी भविष्य सुनिश्चित करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे असं हरदीप सिंग पुरी म्हणाले. त्यासाठी इथेनॉलचे अन्य इंधनात मिश्रण, बायोगॅस, शाश्वत विमान इंधन, बायोमास इत्यादी बाबींना सरकार प्राध्यान्य देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

महावितरण

बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित केलेल्या नागपूर जिल्ह्यातील तब्बल 94 हजार 284 घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी महावितरणतर्फ़े अभय योजना सुरु करण्यात आली आहे. याद्वारे ग्राहकांना वीजबिलाच्या थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण 61 कोटी 62 लाख रुपये माफ करण्यात येणार आहेत. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ग्राहकांना कारवाईपासून दिलासा देण्यासाठी 1 सप्टेंबरपासून ही अभय योजना सुरु करण्यात आली असून या योजनेचा बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित केलेल्या नागपूर परिमंडलातील ग्राहकांना महाडिस्कॉम च्या संकेतस्थळावरून तसंच महावितरणच्या मोबाईल ॲपवरून या योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक 1912 किंवा 18002333435 किंवा 18002123435 या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात.

****

जनवरांना मारण्याची परवानगी

शेतात घुसून पिकांचं नुकसान करणारी रानडुकरं आणि रोही यांना मारण्याची परवानगी २४ तासांच्या आत देण्याचा निर्णय राज्याच्या महसूल आणि वनविभागानं घेतला आहे. याआधी अशी परवानगी शेतकरी किंवा वनविभागाच्या अधिकाऱ्यांना नव्हती. आता अशी परवानगी मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना संबंधित वनक्षेत्रपालांकडे लेखी अर्ज करून त्याची पोचपावती घ्यावी लागेल. अर्ज दाखल झाल्यानंतर २४ तासांच्या आत परवानगी दिली नाही, किंवा नाकारली नाही, तर ती परवानगी दिली असल्याचं गृहीत धरलं जाणार आहे.

****

भाजप वॉर रूम

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते अमरावती ग्रामीण भाजपच्या सुसज्ज अशा जिल्हा वॉर रूमचं उद्घाटन काल करण्यात आलं आहे. शासनाच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे, पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांच्यामध्ये योग्य तो समन्वय राखणे, पक्षाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचे विविध माध्यमांमधून जास्तीत जास्त पद्धतीने प्रचार-प्रसार करणे यासह विविध बाबींचा अभ्यास करण्यासाठी व शास्त्रशुद्ध पद्धतीने नागरिकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्यासाठी भाजपने तयारी केली आहे.

****

मविआ आंदोलन

मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडी तर्फे नागपुरात महालस्थित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ सरकारच्या विरोधात आंदोलन करण्यात आली. आमदार विकास ठाकरे यांसह नागपुर शहर जिल्हा महाविकास आघाडीतील सर्व पक्षांचे प्रमुख आणि पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते.

****

हवामान

विदर्भाच्या यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून बुलढाणा, वाशीम आणि अमरावती जिल्ह्यात देखील जोरदार पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यात उद्या देखील असेच पर्जन्यमान राहील तर उर्वरित विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. नागपुरात संध्यकाळी ४.३० च्या सुमारास मेघगर्जनेसह जोरदार पावसाला सुरवात झाली. या पावसाने वातावरणात निर्माण झालेला उकाडा काही प्रमाणात कमी झाला. वाशिम जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत असून या पावसाने वाशिम तालुक्यातील केकतउमरा ते विळेगाव रस्तावरील पुलावरून पाणी वाहत असल्यानं रस्ता बंद झाला आहे, तसेच आसोला जहागिर इथं नदीला पुर आल्याने पुलावरून पाणी वाहत आहे. तर कळंबा महाली येथील शेत शिवारामध्ये पाणी शिरलं आहे. मालेगाव तालुक्यातील मेडशी ते आंधारसावंगी रोडवरील लेंडी नाल्याला पूर आल्याने वाहतूक बंद आहे. दरम्यान, वाशीम शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या एकबुर्जी प्रकल्पाने पाण्याची सरासरी पातळी गाठली असुन धरण ९० टक्के भरले आहे अशी माहिती वाशिम जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली. दरम्यान, देशाच्या विविध भागात पावसाचा जोर असून ठिकठिकाणी नद्यांचे प्रवाह फुगले आहेत. तेलंगण, आंध्रप्रदेश आणि पश्चिम महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांना पुराचा फटका बसला आहे.

****

पॅराऑलिंपिक

पॅरिस पॅरालिम्पिकच्या आजच्या पाचव्या दिवशी भारताचा थाळीफेकपटू योगेश कथुनिया यानं रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. त्यामुळे या स्पर्धेत आता भारताची पदक संख्या ८ झाली आहे. पकतालिकेत आज आणखी भर पडण्याची आशा आहे.

****